# बी एस एस कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय माकणी, ता. लोहारा जि उस्मानाबाद

मराठी विभाग

बी. ए. प्रथम वर्ष मराठी (ऐच्छिक) पेपर क्र.१ ला.

काव्यात्म साहित्य

प्रा डॉ काकासाहेब सुरवसे

# ३. कुसुमाग्रज

**विष्णू वामन शिरवाडकर (१९१२ - १९९९)** ‘कुसुमाग्रज’ या टोपणनावाने काव्यलेखन. ज्ञानपीठ पुरस्काराचे मानकरी. कवी, नाटकार, कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध. वाङ्मयीन कर्तृत्वाबद्दल पुणे विद्यापीठातर्फे डी.लिट. पदवीने सन्मानित. महाराष्ट्र शासनाचा राम गणेश गडकरी पुरस्कार. १९६४ मध्ये पणजी (गोवा) येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

‘विशाखा’, ‘किनारा’, ‘मराठी माती’, ‘जीवनलहरी’, वादळवेल, ‘हिमरेषा’, ‘छंदोमयी’, मुक्तायन, इ. काव्यसंग्रह, ‘दूरचे दिवे’, ‘ययाती आणि देवयानी’, ‘नटसम्राट’, ‘वीज म्हणाली धरतीला’, ‘विदूषक’ इत्यादी नाटके, ‘जान्हवी’, ‘कल्पनेच्या तीरावर’, ‘वैष्णव’, या कादंबऱ्या, ‘आहे आणि नाही’ हा ललित लेखसंग्रह, शेक्सपिअरच्या शोधात हा समीक्षाग्रंथ.

# ३.५ सर्वात्मका शिवसुंदरा

सर्वात्मका, शिवसुंदरा स्वीकार या अभिवादना
तिमिरातूनी तेजाकडे प्रभू आमुच्या ने जीवना ।। धृ. ।।

सुमनांत तू, गगनांत तू
ताऱ्यांमध्ये फुलतोस तू
सद्धर्म जे जगतामध्ये
सर्वांत त्या वसतोस तू
चोहीकडे रूप तुझी जाणीव ही माझ्या मना ॥ १ ॥

श्रमतोस तू शेतामध्ये
तू राबसी श्रमिकांसवे
जे रंजले अन् गांजले
पुसतोस त्यांची आसवे
स्वार्थाविना सेवा जिथे तेथे तुझे पद पावना ॥ २ ॥

करुणाकरा करुणा तुझी
असता मला भय कोठले ?
मार्गावरी पुढती सदा
पाहीन मी तव पाउले
सृजनत्व या हृदयामध्ये नित जागवी भीतीविना ॥ ३ ॥